महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ८८ /२०२३ दि. १३/०६/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये मानकोली–मोठागाव उड्डाणपूल वाहतुकीकरीता लवकरच खुला करण्यात येणार आहे. सदर रस्ता सुरू झाल्यानंतर भिवंडी–ठाणे ते डोबिवली असा मार्ग जवळचा असल्याने त्या मार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक सुरू होणार आहे. तसेच डोंबिवली शहरात अरूंद रस्ते असून सद्यस्थितीत जड, अवजड वाहनांची वाहतूक सुरू झाल्यास नमूद मार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या मोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड**, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** मानकोलीकडून मोठागावकडे उड्डाणपूल मार्गे जाण्यास जड, अवजड वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदरची अधिसूचना मानकोली–मोठागाव रस्ता वाहतुकीकरीता खुला करण्यात आल्यानंतर अंमलात येईल. सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका
– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
२/— आपणास विनंती करण्यात येते की,आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित होणेस विनंती आहे.